**कृषि विज्ञान केंद्र,धुळे. आत्मा धुळे आणि लूपिन, धुळे  यांच्या वतीने कृषि विज्ञान केंद्र धुळे या ठिकाणी पशुपालकांकरीता पशुधन व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न..**

कृषि विज्ञान केंद्र,धुळे. आत्मा धुळे आणि लूपिन, धुळे  यांच्या वतीने कृषि विज्ञान केंद्र धुळे या ठिकाणी पशुपालकांकरीता पशुधन व्यवस्थापन तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न. सदर प्रशिक्षण मा. डॉ. बबनराव ईल्हे, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या कार्यक्रमास डॉ. राहुल देसले, प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, धुळे, डॉ. गरीश पाटील, उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग, धुळे, श्री. हितेंद्र सोनवणे, प्रकल्प संचालक, आत्मा, धुळे, डॉ. दिनेश नांद्रे, वरिष्ट शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ. मिलिंद भणगे, सहायक उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग, धुळे,  श्री. जगदीश कथेपुरी, डॉ. अतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी श्री. जयराम गावीत, श्री. गौरव पाटील, लूपिन फाउंडेशन चे धुळे येथील अधिकारी, कर्मचारी  आदि. मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमास धुळे येथील पशुपालक मोठ्या संखेने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे, यांनी केले. प्रस्ताविकामद्धे त्यांनी प्रशिक्षणाचा उद्देश तसेच एकात्मिक शेती पद्धतीमध्ये पशुधनाचे महत्व अधोरेखित करत उपस्थिताना मार्गदर्शन केले. प्रमुख मनोगता मध्ये डॉ. राहुल देसले यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेमद्धे पशुधनाचे योगदान महत्व तसेच पशुधन व्यवस्थापनातील चार सूत्री कार्यक्रमावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले.  डॉ. हितेंद्र सोनवणे, यांनी नैसर्गिक तथा सेंद्रिय शेतीमधील योगदान अधोरेखित करत मार्गदर्शन केले. डॉ.गिरीश पाटील यांनी पशुसंवर्धन विभगाच्या महत्वपूर्ण योजना याविषयी माहिती अवगत करून दिली.

तांत्रिक मार्गदर्शनामद्धे डॉ. धनराज चौधरी यांनी शास्वत गोपालन आणि किफायतशीर शेळी पालन याविषयावर मार्गदर्शन केले. पशुधनातील रोग व्यवस्थापन, लसीकरण याविषयी डॉ. मिलिंद भणगे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. अतिश पाटील यांनी शेणखताचे महत्व तसेच गांडूळ खत उत्पादन या विषयी मार्गदर्शन केले. **अध्यक्षीय मार्गदर्शना मध्ये** डॉ. बबनराव ईल्हे यांनी पशुधनाचे महत्व स्पष्ट करत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे राबवित असलेल्या विविध उपक्रमाविषयी माहिती देत यामध्ये प्रामुख्याने चारा पिकांचे योगदान व त्यांचा वापर यावर सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे  संचालन डॉ. धनराज चौधरी तर आभार प्रदर्शन श्री. अतिश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्र धुळे येथील सर्व शात्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी, लूपिन फाउंडेशन चे धुळे येथील अधिकारी, कर्मचारी, आत्मा, धुळे येथील सर्व अधिकारी, कर्मचारी  यांचे अनमोल सहकार्य लाभले.